**जिल्हा परिषद आस्थापनेवरील शिक्षक संवर्गातून विविध पदांवर पदोन्नतीसाठीची कालबध्द कार्यपध्दती विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- २०२६/प्र.क्र. २४४/टीएनटी-१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक : २९ जुलै, २०२६.**

<u>**संदर्भ**</u> : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-२०१८/प्र.क्र. १५९/ कार्यासन-१२, दि. ०१.०८.२०१९.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र क्र. प्राशिसं/ड-३०१/शिक्षक संवर्ग पदोन्नती/ २०२६, दि. १४.०५.२०२६.
३) रिट याचिका क्र. ४५७४/२०२६ या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी पारीत केलेला दि. १०.०७.२०२६ रोजीचा न्यायनिर्णय.

<u>**प्रस्तावना :**</u>

जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवरील शिक्षक संवर्गातून विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक इत्यादीं पदांवर त्या-त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नती देण्यात येते. सदर पदोन्नती ज्येष्ठता-नि-पात्रता या आधारावर दिली जाते. मा. सर्वोच्च न्यायालयाने अंजूमन ईशात-ए-तालिम ट्रस्ट विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणात दि.०१.०९.२०२५ रोजी पारीत केलेल्या न्यायनिर्णयानुसार टीईटी/सीटीईटी उत्तीर्ण होणे ही पदोन्नतीसाठीची आवश्यक पात्रता ठरविली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये प्रत्येक वर्षाचा दि. ०१ सप्टेंबर हा पदोन्नती प्रक्रिया सुरु होण्याचा दिनांक ठरविण्यात आला आहे. या आधारावर संदर्भ क्र. २ अन्वये पदोन्नती संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र. २ येथील दि. १४.०५.२०२६ रोजीच्या पत्रास मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. ४५७४/२०२६ अन्वये आव्हान देण्यात आले होते. या प्रकरणांचा न्यायनिर्णय दि. १०.०७.२०२६ रोजी पारीत झाला असून त्याद्वारे संदर्भ क्र. २ येथील दि. १४.०५.२०२६ रोजीचे पत्र रद्दबातल ठरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण राज्यात पदोन्नती प्रक्रियेत एकसुत्रता असावी, जेणेकरुन विद्यार्थी हित व शिक्षकांना दिलासा मिळेल या दृष्टीने कार्यवाही करण्यासंदर्भात शासनास निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

संदर्भ क्र. २ येथील दि. १४.०५.२०२६ रोजीचे पत्र दि. १०.०७.२०२६ रोजीपासून रद्दबातल ठरविण्यात येत आहे.

२. जे शिक्षक TET/CTET उत्तीर्ण असणे या अर्हतेबरोबरच सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असणारा अनुभव व अन्य अर्हता धारण करीत आहेत, त्यांचा समावेश पदोन्नतीसाठीच्या विचारक्षेत्रात करण्यात यावा.

३. दि. १०.०७.२०२६ पूर्वी ज्या जिल्हा परिषदांमध्ये पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशा पदोन्नत्यांना संरक्षण देण्यात येत आहे. ज्या ठिकाणी पदोन्नती आदेश निर्गमित झाले आहेत, त्या ठिकाणची पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाली आहे असे समजण्यात येईल.

३. पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशा पदोन्नत्यांना संरक्षण प्रदान करण्यात आले असले तरी जे शिक्षक अन्यथा पदोन्नतीसाठी पात्र ठरले असते, मात्र दि. १४.०५.२०२६ रोजीच्या शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या पत्रामुळे अपात्र ठरले, असे शिक्षक यानंतर पदोन्नत झाल्यास पदोन्नतीच्या संवर्गातील त्यांची सेवाज्येष्ठता ही निम्न संवर्गातील परस्पर ज्येष्ठतेच्या आधारे निश्चित करण्यात यावी.

४. पदोन्नती प्रक्रियेत संपूर्ण राज्यात एकसुत्रता असावी यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अ) <u>या चालू वर्षी करावयाच्या पदोन्नतीबाबत</u>-**

I. माहे ऑगस्ट २०२६ च्या पहिल्या आठवडयात पदोन्नती समितीची बैठक घेण्यात यावी.

II. पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकास विचार क्षेत्रातील उमेदवारांचा सेवा कालावधी व TET/CTET सह अन्य अर्हता विचारात घेण्यात यावी.

III. पात्र उमेदवारांची पदोन्नतीसाठी शिफारस करण्यात यावी.

IV. संपूर्ण पदोन्नती प्रक्रिया लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत दि.३१.०८.२०२६ पर्यंत पूर्ण करण्यात यावी. उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित झाल्यानंतरच पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाली आहे असे समजण्यात येईल.

**<u>ब) पुढील वर्षी पासून करावयाच्या पदोन्नतीबाबत-</u>**

I. प्रत्येक वर्षाच्या दि. ०१ जानेवारी रोजी आवश्यकता असल्यास तात्पूरती सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात यावी. यासंदर्भात आलेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम सेवाज्येष्ठता यादी दि. ३१ जानेवारी रोजी प्रसिध्द करण्यात यावी.

II. तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्याची आवश्यकता नसल्यास दि. ०१ जानेवारी रोजी अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात यावी.

III. दि. १५ फेब्रुवारी ते दि. २२ फेब्रुवारी या कालावधीत पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात यावी. बैठकीच्या दिनांकास विचार क्षेत्रातील उमेदवारांचा सेवा कालावधी व TET/CTET सह अन्य अर्हता विचारात घेण्यात यावी.

IV. पात्र उमेदवारांची शिफारस करण्याची कार्यवाही पुढील एक आठवडयात करण्यात यावी.

V. दि. ३१ मार्च पर्यंत पदोन्नतीचे आदेश निर्गमित करुन पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

VI. दि. ३१ मार्च पर्यंत पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात आले तरी पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात येऊ नये. असे शिक्षक दि. ०२ मे रोजी पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू होतील या दृष्टीने त्यांना कार्यमुक्त करण्यात यावे.

५. उपरोक्त प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करणे सर्व जिल्हा परिषदांसाठी अनिवार्य असेल. या कार्यपध्दतीची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असेल. अशा प्रकारे कार्यवाही करताना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर आदेश संदर्भ क्र. ३ येथील न्यायनिर्णयान्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार तसेच ग्राम विकास विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र. ०१/२०२६/आस्था-१४, दि.२८.०७.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या त्या विभागाच्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२९१९१०२२२६४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.07.29 19:11:10 +05'30'

(आबासाहेब कवळे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास / राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१२) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)
१८) सर्व गट शिक्षणाधिकारी
१९) निवड नस्ती- टीएनटी-१